MHNG160010302025

**नियमित फौजदारी खटला क्र. १३५/२०२५.**

सरकार वि. बाबी उर्फ अजूबा.

# निशाणी क्र. २९ खाली आदेश.

(गुन्हा रजि. क्र. २६१/२०२५ मौदा पोलीस ठाणे)

( दि.१६.०३.२०२६ )

०१. अर्जदार – मारोती विश्वनाथ मोते, यांनी जप्त मुद्देमाल म्हणजेच खालील नमूद दागिणे परत मिळण्याकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

| अ.क्र. | जप्त मुद्देमालाचे वर्णन | दागिन्यांचे वजन |
|---|---|---|
| १. | सोन्याचे ब्रेसलेट | ३० ग्रॅम |
| २. | सोन्याचा गोफ | १५ ग्रॅम |

०२. अर्जदार यांच्या कथनांनुसार, वर नमूद मुद्देमाल हा दि.३१.०३.२०२५ रोजी अनोळखी इसमांनी बळजबरीने हिसकावून घेऊन पळून गेल्याबाबतची तक्रार पोलीस स्टेशन मौदा येथे दि.०१.०४.२०२५ रोजी नोंदवली होती. सदर नमुद मुद्देमाल हा मौदा पोलीस ठाणे यांनी आरोपी क्र. ५ व ६ कडून लगड स्वरूपात मौदा पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र.२६१/२०२५ चे कामी जप्त केला आहे. आरोपींनी चोरी केलेला मुद्देमाल व आरोपींकडून जप्त केलेली लगड हे एकाच वजनाचे आहेत. तसेच सदरचा मुद्देमाल हा अर्जदार यांच्या मालकीचा असून ते पोलीस ठाण्यात पडून राहिल्यास वातावरणातील बदलामुळे सदर दागिन्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. सबब, योग्य त्या अटी व शर्तीवर सदरचा मुद्देमाल अर्जदार ह्याच्या ताब्यात मिळण्याची विनंती अर्जदार ह्याने केली आहे.

०३. सदर अर्जावर विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे मागवण्यात आले. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी असे नमुद केले आहे की, अर्जदाराने दागिन्यांचे मूळ बील दाखल केलेले नाही. त्यामुळे सदरचे दागिणे अर्जदारास देणे न्यायोचित नाही. सदरचे दागिणे अर्जदारास दिल्यास तो सदर खटल्याच्या सुनावणी दरम्यान दागिणे ओळख पटवीणे कामी हजर राहणार नाही. त्यामुळे सदरचे दागिणे अर्जदारास पतर न देण्याची विनंती सह. सरकारी अभियोक्ता यांनी केली आहे.

०४. आरोपी क्र.५ संजय रंजीत दीघपते याने त्याचे म्हणणे नि.क्र.३१ व आारोपी क्र.६

राकेश उर्फ लाला गंगाप्रसाद गुप्ता याने त्याचे म्हणणे नि.क्र.३२ वर दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जदाराने सदरचा अर्ज सोन्याची लगडी परत मिळणेकामी अर्ज दाखल कलो आहे. परंतु, सदर गुन्ह्यातील प्रथम माहिती नुसार सोन्याची लगडी अज्ञात चोराने चोरी केल्याबाबतची नाही. सोन्याची लगडी ही सदर खटल्यातील मौल्यवान पुरावा आहे. म्हणून तो पुराव्याकामी न्यायालयात हजर करणे जरूरीचे आहे. मुद्देमालाची मालकी सदर अर्जामधे ठरविता येणार नाही. त्यामुळे सदर खटल्याची संपूर्ण सुनावणी होऊन मुद्देमालाचा मालक ठरवल्यानंतरच सदरचा मुद्देमाल संबंधित मालकाला देणे गरजेचे आहे. अर्जदाराने मुद्देमालाच्या मालकीचा पुरावा दाखल केलेला नाही. सदरचे मुद्देमाल म्हणजेच सोन्याची लगडी ३० ग्रॅम ही संजय दीघपते याच्या ताब्यातून व सोन्याची लगडी १६ ग्रॅम ही राकेश उर्फ लाला गंगाप्रसाद गुप्त यांच्या ताब्यातून जप्त करण्यात आली आहे. त्यामुळे सदरचा मुद्देमाल अर्जदारास परत देता येणार नाही.

०४. अर्जदाराने **निशाणी क्र.०३** वरील यादी सोबत एफ.आय.आर. ची प्रत, तिचे स्वतःचे आधारकार्डची प्रत व सोने खरेदी केल्याबाबतची पावती इत्यादी कागदपत्रांच्या प्रती दाखल केल्या आहेत. तसेच **निशाणी क्र.०५** वरील पुरसिस मधे आरोपीने पोलीसांनी त्याच्याकडून जप्त केलेला मुद्देमाल अर्जादारास दिल्यास त्याची काहीही हरकत नसल्याचे नमुद केले आहे.

०५. अर्जदाराने सदर अर्जाच्या पुश्च्यार्थ निशाणी क्र.३०/१ वर बील पावती दाखल केली आहे. सदर खटल्यामधे प्रथम माहिती अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसुन येत आहे की, अर्जदार याने दिलेल्या माहिती प्रमाणेच प्रथम माहिती अहवाल नोंदवण्यात आला आहे. अर्जदाराने प्रथम माहिती अहवाल नोंदवित असतांना दि.३०.०३.२०२५ रोजी सकाळी १२.३० वा सुमारास त्याच्या घरातील त्याचे ३० ग्रॅम वजानाचे सोन्याचे ब्रेसलेट व १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन अज्ञात चोराने चोरी केल्याचे नमुद केले आहे. निशाणी क्र.३०/१ वरील पावतीचे अवलोकन केले असता, सदर पावती ही, अर्जदाराच्या नावे असल्याचे दिसुन येत आहे. तसेच, अर्जदाराने मॉ भवानी ज्वेलर्स वडोदा, या सोने चांदीच्या दुकानातून गुन्ह्यातील मुद्देमाल खरेदी केल्याचे दिसुन येत आहे. सबब, प्रथमदर्शनी अर्जदार हा सदर खटल्यात दाखल असलेला प्रथम माहिती अहवालालतील नमुद मुद्देमालाचा मालक व कब्जेदार असल्याचे दिसुन येत आहे.

०६. सदरचा मुद्देमाल तपासी अधिकारी यांनी आरोपी क्र.५ व ६ यांच्याकडून जप्त केला आहे. आरोपी क्र.५ संजय याच्या म्हणण्यानुसार ३० ग्रॅम सोन्याची लगडी त्याच्या ताब्यातून जप्त करण्यात आली आहे. आरोपी क्र.६ याच्या म्हणण्यानुसार १६ ग्रॅम सोन्याची लगडी त्याच्या ताब्यातून जप्त करण्यात आली आहे. परंतु सदर खटल्यातील प्रथम माहिती अहवाल हा, सोन्याचे ब्रेसलेट व सोन्याची चेन याबाबत आहे. सदरचा प्रथम माहिती अहवालामधे सोन्याच्या लगडी बाबत कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे मुद्देमाल म्हणजेच सोन्याची लगडी अर्जदारास परत देता येणार नाही. ही बाब या

ठिकाणी नमुद करणे न्यायोचित आहे की, सदर खटल्यामधे आरोपी क्र.५ व ६ यांच्या विरोधात भा.न्या.संहिता कलम ३१७(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सदरचे दोन्ही आरोपी हे व्यवसायाने सराफ आहेत. अशा परिस्थितीमधे एखादा सराफ तो खरेदी करीत असलेले दागिणे चोरीचे आहे माहित असतांना खरेदी केली असेल तर, तो दागिणे मूळ स्वरूपामधे कधीच ठेवणार नाही. दागिणे वितळवूण त्याची लगडी बनवली असेल. तसेच सदर खटल्यातील सोन्याच्या ब्रेसलेटचे वजन ३० ग्रॅम आहे व सोन्याच्या चेन चे वजन १५ ग्रॅम आहे, तर आरोपी क्र.५ याच्याकडूनही सोन्याची ३० ग्रॅम लगडी जप्त केली आहे. तसेच आरोपी क्र.६ याच्याकडून १६ ग्रॅम वजनाची सोन्याची लगड जप्त करण्यात आली आहे. त्यामुळे आरोपी क्र.५ व ६ यांच्याकडून जप्त करण्यात आलेली सोन्याची लगड ही सदर खटल्यातील सोन्याचे ब्रेसलेट व सोन्याची चेन यांना वितळून तयार करण्यात आलेलेली लगड दिसुन येत आहे. अशा परिस्थितीमधे जप्त मुद्देमाल सोन्याची लगड चा अंतरीम ताबा सदर आरोपींकडे देणे न्यायोचित नाही. उलटपक्षी फिर्यादी /अर्जदार याने दाखल केलेल्या दस्तएवजाच्या आधारे सदर ३० ग्रॅम व १५ ग्रॅम सोन्याची लगड त्याची असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे खटल्याचा गुण दोषावर अंतिम निकाल लागेपर्यंत सदर दोन्ही सोन्याची लगड चा अंतरीम ताबा फिर्यादी / अर्जदारास देणे न्यायोचित ठरेल. वरील बाबीचा विचार करून मी पुढील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश.

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. मौदा पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र.२६१/२०२५ मधील अर्जात नमूद जप्त मुद्देमाल ३० ग्रॅम सोन्याची लगड व १५ ग्रॅम सोन्याची लगड चा अंतरीम ताबा अर्जदार – मारोती विश्वनाथराव मोते, यांना रक्कम रु.१,५०,०००/- (रुपये एक लाख पन्नास हजार फक्त) च्या इन्डेंमनीटी बॉडवर (Indemnity Bond) पुढील अटी व शर्तीनुसार देण्यात येत आहे.

अ) मुद्देमाल यात कुठलाही बदल करु नये.

ब) विक्री, गहाण, भेट, बक्षीस इत्यादी कोणत्याही मार्गाने मुद्देमालाची विल्हेवाट लावू नये.

क) न्यायालय सांगेल त्यावेळेस मुद्देमाल न्यायालयासमक्ष हजर करावा.

३. सदरचा मुद्देमाल ताब्यात देताना तपासणी अंमलदाराने त्याच्याकडील असलेल्या मुद्देमाल रजिस्टरचा उतारा दोषारोपपत्रात दाखल करावा.

४. सदर मुद्देमाल परत करताना तपासी अंमलदार यांनी मुद्देमालाची ३ रंगीत छायाचित्रे काढून ती या खटल्याच्या निकालापर्यंत जतन करून ठेवावीत.

५. येणे प्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

LYAKATALI MUBARAK PATHAN
Digitally signed by LYAKATALI MUBARAK PATHAN
Date: 2026.03.17 16:23:36 +0530

मौदा
दिनांक १६.०३.२०२६.

( **एल. एम. पठाण** )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मौदा